# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.08.2024** **वार:सोमवार**

---

1. विकसित भारताच्या उभारणीत महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार
2. जळगावमधील कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते देशभरातल्या 11 लाख लखपती दीदींचा गौरव
3. राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवापिढीला, राजकारणात येण्याबाबत केलेल्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचं पंतप्रधानांचं मन की बातमध्ये प्रतिपादन
4. सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय आणि
5. राज्याच्या अनेक भागात पावसाचा जोर कायम; विविध धरणांमधून विसर्ग सुरू

**<u>पंतप्रधान</u>**

आपल्या देशाची विकसित राष्ट्राकडे वाटचाल सुरू असून यामध्ये महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल काढले. जळगाव इथं आयोजित देश पातळीवरील लखपती दीदी संमेलनात ते बोलत होते. मागील एक महिन्यात 11 लाख दीदी लखपती बनल्या. यात 1 लाख दीदी महाराष्ट्रातील आहेत. महिलांनी लखपती दीदी होणं, ही घटना संपूर्ण कुटुंबाचं जीवन बदलण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल, असं पंतप्रधान म्हणाले. या कार्यक्रमाला राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आणि रक्षा खडसे उपस्थित होते.

पंतप्रधानांनी यावेळी आपल्या भाषणात महिला विकासासंदर्भात विविध मुद्द्यांना स्पर्श करत सांगितलं की, महिलांच्या समस्या सोडवण्याचा संकल्प केंद्र शासनानं केला आहे. महिलांसाठी 3 कोटी घरे बांधताना, ती त्यांच्या नावावर केली जातील. त्यांच्यासाठी मुद्रा योजना, स्व-निधी योजना सुरू केली. सखी मंडळामार्फत 10 कोटी महिला जोडल्या गेल्या असून, बचत गटांना गेल्या दहा वर्षांत 9 लाख कोटीची मदत केली, असं त्यांनी नमूद केलं. महाराष्ट्राला राजमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले असा मातृशक्तीचा समृध्द आणि गौरवशाली वारसा लाभला असा गौरवपूर्ण उल्लेखही मोदी यांनी केला. महिलांच्या सुरक्षेबाबत सरकार कटिबद्ध असल्याचं सांगताना पंतप्रधान मोदी म्हणाले....

**माताओं-बहनों-बेटियों का सामर्थ्य बढ़ाने के साथ-साथ उनकी सुरक्षा भी देश की प्राथमिकता है। मैं एक बार फिर देश के हर राजनीतिक दल से कहूंगा, हर राज्य सरकार से कहूंगा कि महिलाओं के खिलाफ अपराध अक्षम्य पाप है। दोषी कोई भी हो, वो बचना नहीं चाहिए। उसको किसी भी रूप में मदद करने वाले बचने नहीं चाहिए। अस्पताल हो, स्कूल हो, दफ्तर हो या फिर पुलिस व्यवस्था, जिस भी स्तर पर लापरवाही होती है, सबका हिसाब होना चाहिए। ऊपर से नीचे तक मैसेज एकदम साफ जाना चाहिए कि ये पाप अक्षम्य है। अरे सरकारें आती रहेंगी, जाती रहेंगी, लेकिन जीवन की रक्षा और नारी गरिमा की रक्षा, ये समाज के रूप में भी और सरकार के रूप में भी हम सबका बड़ा दायित्व है।**

नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या जळगावमधील यात्रेकरूंबाबत पंतप्रधानांनी दु:ख व्यक्त केलं आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली. राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह विविध योजना राबवण्यात येत असून, या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचं काम राज्य शासन करत आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. देशाच्या 3 कोटी लखपती दीदी बनवण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असून, राज्यातील 50 लाख दीदींचा समावेश असेल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लखपती दीदी ही महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि विकासाला वेग देणारी योजना असून त्यांना स्वावलंबी करण्याचा हा प्रयत्न असल्याचं शिवराज सिंह चौहान यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्रात 11 लाख लखपती दीदी झाल्या आहे. त्यांनी इतरांना प्रेरित करावे, असं आवाहन त्यांनी केलं.

राज्यात बचत गटांमार्फत 75 लाख कुटूंब जोडली गेली असून, दोन कोटी कुटूंब जोडण्याचा संकल्प आपण केला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. संपूर्ण देशात सुरू असलेला विकासाचा रथ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपानं जळगाव जिल्ह्यात आला असून मोदी यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प केला आहे. त्याच वेळी राज्यात 50 लाख लखपती दीदी बनविण्यासाठी राज्य शासनानं पुढाकार घेतल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वंदना पाटील, मनीषा जगताप, ज्योती तागडे, सीमा कांबळे, रमा ठाकूर यांच्यासह विविध राज्यातील निवडक महिला प्रतिनिधींना मोदी यांच्या हस्ते लखपती दीदी झाल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आलं; तसंच बचत गटाच्या 48 लाख महिलांना 2 हजार 500 कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचं वितरण करण्यात आलं.

**<u>मन की बात</u>**

अंतरिक्ष क्षेत्रातील सुधारणांमुळे देशातील युवा वर्गाला मोठा फायदा झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमात बोलत होते. नुकत्याच साजऱ्या झालेल्या पहिल्या राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त अंतरिक्ष तंत्रज्ञान क्षेत्रातल्या युवकांशी त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा एकशे तेरावा भाग होता. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवक-युवतींनी राजकारणात यावं, असं आवाहन आपण स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलं होतं, त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. आज मोठ्या संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधी देण्याची गरज आहे, असं पंतप्रधान म्हणाले. युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलवून टाकणारं ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, अनेकांनी स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच समर्पण भावनेची गरज असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवल्या गेलेल्या हर घर तिरंगा अभियानाला यंदाही मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. पॅरिसमध्ये होणाऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेत देशाचं प्रतिनिधीत्व करत असलेल्या आपल्या दिव्यांग खेळाडूंना चिअर फॉर भारत हा हॅश टॅग वापरून प्रोत्साहन द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. पर्यावरण संवर्धन, लहान मुलांचं पोषण, नुकताच साजरा झालेला संस्कृत भाषा दिन अशा विविध विषयांवर त्यांनी कालच्या मन की बातमधून भाष्य केलं. येत्या काही दिवसात साजऱ्या होणाऱ्या सण-उत्सवांसाठी त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**<u>राज्य मंत्रिमंडळ</u>**

केंद्र सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करायला राज्य मंत्रीमंडळानं काल मंजुरी दिली. यावर्षीच्या मार्चपासूनच याची अंमलबजावणी होणार असून लाखो कर्मचाऱ्यांना याचा फायदा मिळेल. शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पालाही सरकारनं

काल मंजुरी दिली. 7 हजार 15 कोटी रुपयांच्या या प्रकल्पानं नाशिक आणि जळगाव जिल्ह्याला मोठा फायदा होणार आहे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकांकडून कर्जासाठी शासन हमी देण्यात येते. या कर्जाची व्याजासह परतफेड करण्यासाठी संपूर्ण संचालक मंडळ वैयक्तिक आणि सामुहिकरित्या जबाबदार राहतील अशी अट टाकण्याचा निर्णय काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान पर्यायी बोगदा काढायलाही मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. यामुळं पुणे परिसरात सिंचन, पिण्यासाठी अधिक पाणी उपलब्ध होईल. आरोग्य खात्यातल्या गटप्रवर्तकांच्या मानधनात 4 हजार रुपयांची वाढ करणं, तसंच ज्येष्ठ नागरिकांसाठी महामंडळ स्थापन करण्यालाही कालच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली.

**<u>विशेष रेल्वे यात्रा-नांदेड</u>**

आगामी काळात नांदेडचं रेल्वे स्थानक, सर्व सोयी सुविधा असलेलं, देशातलं सर्वोत्तम रेल्वे स्थानक करण्यात येईल, असं केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंघ यांनी म्हटलं आहे. गुरुद्वारा शहीद बाबा भुजंग सिंघजी चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने पंच तख्त साहिबांच्या दर्शनाची विशेष रेल्वे यात्रा सरु करण्यात आली आहे. काल नांदेड इथून रवनीतसिंघ यांनी या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं, त्यानंतर ते बोलत होते.

**<u>मृत्यू-जालना</u>**

जालना औद्योगिक वसाहतीमधील गजकेसरी स्टील कारखान्यात झालेल्या स्फोटात जखमी एका कामगाराचा काल छत्रपती संभाजीनगर इथ उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर अन्य तीन कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या कंपनी मालकासह इतर दोघांना न्यायालयानं काल जामीन मंजूर केला.

**<u>पाऊस</u>**

राज्यात काल सर्वदूर पाऊस झाला असून, अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत, तर विविध धरणांतून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे. पुणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्यात काल कमी अधिक प्रमाणात पाऊस सुरूच होता

कोल्हापूर जिल्ह्यात गेले दोन दिवस सुरू असलेल्या अतिमुसळधार पावसामुळे राधानगरी धरण 100 टक्के भरलं असून धरणाचे चार स्वयंचलित दरवाजे खुले झाले आहेत. या विसर्गामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.

नाशिक शहरासह जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला पुर आला आहे. गंगापूर, दारणा, नांदूर मध्यमेश्वर धरणातून विसर्ग सुरूच असून नदीकाठच्या नागरिकांना स्थलांतरित करण्यात येत आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि विदर्भात वीजांसह अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.